# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/२३ दिनांक: २ डिसेंबर २०१७

## अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक

अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीबाबत, विद्यापीठाद्वारे दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/१५ ला जोडून विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ प्रसिध्द करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीतील व दिनांक १६ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधरांच्या पुरवणी नोंदवहीतील पदवीधरांना नोंदणीकृत पदवीधरांच्या निर्वाचक गणात आपले नाव समाविष्ट करण्यासाठी सादर करावयाच्या **FORM-B** सोबत दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित निदेश क्रमांक ३६/२०१७ मधील अनुच्छेद ६ नुसार पदवीची साक्षांकित प्रत संलग्न करण्याची आवश्यकता नाही. परंतु वर्ष १९८९, १९९४, २०००, २००५ व २०१० मध्ये नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नोंदणी झालेल्या पदवीधरांना नोंदणीकृत पदवीधरांच्या निर्वाचक गणात आपले नाव समाविष्ट करण्यासाठी सादर करावयाच्या **FORM-B** सोबत पदवीची साक्षांकित प्रत संलग्न करणे अनिवार्य आहे.

तसेच, अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीबाबत विद्यापीठाद्वारे दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित अधिसूचनेन्वये जाहिर करण्यात आलेल्या निवडणूक वेळापत्रक भाग १ मधील अनुक्रमांक १ मध्ये बदल करण्यात आला असून नोंदणीकृत पदवीधरांच्या निर्वाचक गणात नाव समाविष्ट करण्याकरीता नोंदणीकृत पदवीधरांना **Online** प्रणालीने **FORM-B** सादर करण्यांची मुदत दिनांक २ डिसेंबर २०१७ वरून **दिनांक ७ डिसेंबर २०१७ पर्यत वाढविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे** निवडणूक वेळापत्रक भाग १ मधील अनुक्रमांक २ मध्ये बदल करण्यात आला असून सर्व संबंधीत पदवीधरांनी **Online** प्रणालीने **FORM-B** मध्ये नाव व इतर माहिती **Election 2017** या पोर्टलवर सादर केल्यानंतर त्याची मुद्रीत प्रत सादर करण्यासाठी दिनांक ७ डिसेंबर २०१७ वरून **दिनांक ११ डिसेंबर २०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व संबंधीत पदवीधरांनी FORM-B** ची मुद्रीत प्रत **दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत** विद्यापीठाच्या निवडणूक कक्षात सादर करावी.

त्याचप्रमाणे, दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित अधिसूचनेतील निवडणूक कार्यक्रम भाग–२, अ.क्र. १ मधील नामनिर्देशन पत्र सादर करण्याविषयीचा अंतिम दिनांक १२ जानेवारी २०१८ रोजी **सायंकाळी ५.०० वाजेपर्यत असा वाचण्यात यावा.**

उपरोक्त निदेश क्रमांक ३६/२०१७ विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election – 2017** या पोर्टलवर व विद्यापीठाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीबाबत, विद्यापीठाद्वारे दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी निर्गमित अधिसूचनेत वरील बदलाशिवाय उर्वरित सर्व बाबी कायम ठेवण्यात आलेल्या आहेत, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी